**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

ऑफि.जन.१/२०२४-२५/ ११६४

दिनांक : ०२/०७/२०२४

# जाहिर आवाहन

संदर्भ : शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/विशि ५, दिनांक २४/०६/२०२४ ला अनुसरून

श्रीमती ना.दा.ठा. महिला विद्यापीठाची स्थापना १९१६ मध्ये झाली असून त्याच्या गौरवशाली अस्तित्वाची १०७ वर्षे पूर्ण झाली आहेत. थोर समाज सुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी व सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठाची स्थापना केली. आज विद्यापीठाचा परिसर हा चर्चगेट, जुहू, पुणे, पालघर आणि चंद्रपूर येथे विस्तारला असून विद्यापीठाची ३१० संलग्नित महाविद्यालये भारतभर पसरलेली आहेत, तसेच १५ संचलित महाविद्यालये व ३८ विद्यापीठ विभाग आहेत.

श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठाची शतकोत्तर वाटचाल सुरू असून कार्यप्रदर्शन आणि नवनवीन उत्कर्षासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. उत्तरोत्तर यात वाढ होत आहे.

एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाव्दारे महिलांचे सक्षमीकरण करण्यास वचनबध्द आहे. तसेच त्यांना संबंधित अभ्यासक्रमाव्दारे समकालीन उच्चशिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट आहे. अनुभविक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्याव्दारे विस्तृत कक्षांचा वापर करून बदलत्या सामाजिक - आर्थिक गरजा भागविण्यासही आम्ही वचनबध्द आहोत. मानवी मूल्य आणि सहेतूक समाजभान याव्दारे प्रत्येक कार्यात उच्चतर गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत.

यात भर पडण्याच्या उद्दीष्टाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नविन महाविद्यालये सुरू करण्यास इच्छुक संस्थांकडून निवेदन मागविण्यात येत आहेत. इच्छूक संस्थांनी लेखी निवेदन खालील माहितीसह, **अधिष्ठाता, संलग्नता विभाग, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, १ एन.टी रोड, मुंबई ४०० ०२०** येथे दिनांक ६/०७/२०२४ रोजी पर्यंत सादर करावेत.

१. संस्थेच्या सध्याच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती.
२. नविन महाविद्यालय सुरु करण्याकरीता अर्जित बिंदूचा जिल्हा, तालुका, ठिकाण, प्रस्तावित अभ्यासक्रम व पिन कोड क्र.
३. संपर्क कर्त्याचे नाव व क्रमांक
४. ईमेल आयडी (पत्रव्यवहाराकरीता)

टिप: सन २०२५-२६ पासून नवीन महाविद्यालय बिंदू करिता अर्ज करतेवेळेस बीबीए/बीसीए/बी.डिझाईन या अभ्यासक्रमांचा समावेश करू नये.

**०६/०७/२०२४ रोजी नंतर प्राप्त होणारी निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

02/07/2024

(डॉ. हिम्मत जाधव)
अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अतिरीक्त भार)

सोबत: अभ्यासक्रम निहाय महाविद्यालय यादी.
प्रत: १. प्र- कुलगुरू कार्यालय, श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठ, मुंबई
२.मा.कुलसचिव कार्यालय, श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठ, मुंबई